# संचालनालय आरोग्य सेवा (महाराष्ट्र शासन)



| | | |
|---|---|---|
| कार्यालय | :२२६२१०३१-३६ | ७ वा मजला, आरोग्य भुवन, |
| संचालक | : २२६२१००६ | सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, |
| सहाय्यक संचालक | : २२६२०२२० | पी. डिमेलो रोड, मुंबई - ४०० ००१. |



क्र.संआसे/निविमू/औख/अनु.वितरण/०७-०८/७ अ/०७
दिनांक - १४ ऑगस्ट, २००७.

प्रति,
उपसंचालक आरोग्य सेवा,
विभागीय मंडळ, लातूर.

विषय : उद्‌गीर व जळकोट तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र या ठिकाणी आयोजित सर्वरोग निदान व उपचार शिबीराकरीता औषधी पुरविण्याबाबत

संदर्भ : उपसंचालक आरोग्य सेवा, विभागीय मंडळ, लातूर यांचे पत्र क्र. उपसंआसेला/भांडार/ /०७, दिनांक : ०७.०७

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधीन पत्रान्वये आपण कळविले आहे की, उद्‌गीर व जळकोट तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र या ठिकाणी ऑगस्ट, २००७ मध्ये भव्य सर्वरोग निदान व उपचार शिबीरे आयोजित करण्यात आलेली आहेत. सदर शिबिरांकरीता आपण औषधांची मागणी केलेली आहे किंवा औषध खरेदीकरीता रुपये ७,४८,६००/- इतक्या अनुदानाची मागणी संचालनालयाकडे केलेली आहे. उद्‌गीर येथे उपजिल्हा रुग्णालय असल्यामुळे याकरिता अनुदान कक्ष - ३ मार्फत प्राप्त होऊ शकेल. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांकरीता रुपये ५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) अनुदान खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून आपल्या अधिनस्त ठेवण्यात येत आहेत.

१) वितरीत करण्यात आलेल्या अनुदानातून फक्त प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांना शिबिराकरीता आवश्यक असणाऱ्या बाबींचा पुरवठा करण्यात यावा. ३) खरेदी ही आवश्यकतेनुसार व साहित्य संपादन समितीच्या मान्यतेने करण्यात यावी. ४) आवश्यक बाबींचा पुरवठा करतांना पंचसुत्रीचा अवलंब करण्यात यावा. ५) पुरवठा करण्यात येणाऱ्या बाबी या शासन मान्य दरकरारावर उपलब्ध आहेत याची खात्री करावी. ६) पुरवठा करण्यात येणाऱ्या बाबी हया न्युनतम दराने खरेदी करण्यात आलेल्या असाव्यात. ७) शिल्लक अनुदानातून अन्य कोणत्याही प्रकारची खरेदी करण्यात येऊ नये. ८) खर्चाचे अहवाल नियंत्रक लेखा व लेखापरिक्षा, पुणे यांना पाठवावेत.

सदरहू खर्च हा सन २००७-०८ यावर्षी खालील लेखाशिर्षाखाली करण्यांत यावा. <u>सदरहू अनुदान हे कोषागारातून रोखीने देय आहे.</u>

<u>मागणी क्रमांक आर - १</u>

२२१० - वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य,०६ - सार्वजनिक आरोग्य,००१ - संचालन व प्रशासन, ००१ - (पाच) जि.प.ना सहाय्यक अनुदाने, (०१) (०६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२२१० ०३९८)

सदरचे अनुदान संचालनालय आरोगय सेवा, मुंबई वेब साईट क्रमांक http:\\maha-arogya.gov.in वर ~~वितरीत करण्यात~~ देण्यात आलेले आहे.

सहसंचालक आरोग्य सेवा,
(निविमू) मुंबई.

प्रत - जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर.
प्रत - एम.आय.एस. कक्ष, संचालनालय आरोग्य सेवा, मुंबई.
यांना कळविण्यात येते की, सदरचे अनुदान वेबसाईटवर टाकण्यात यावे.